# मेघे महाविद्यालयाच्या एमसीए विभागात 'ऑक्युलस-२०१८'

**अमरावती ( प्रतिनिधी):** प्रो.राम मेघे महाविद्यालयात ११ सप्टेंबर २०१८ रोजी एम.सी.ए.विभागातर्फे ऑक्युलस-२०१८ चे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम प्रो.राम मेघे महाविद्यालय व (इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रोनिक्स एंड टेलीकम्युनिकेशन इंजिनिअर्स) अमरावती सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला.

शैक्षणिक प्रगतीबरोबरच विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळावा व त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा याकरिता महाविद्यालय सतत प्रयत्नरत असते व हाच या कार्यक्रमाचाही मुख्य हेतू होता.या अंतर्गत विविध आंतर महाविद्यालयीन स्पर्धा घेण्यात आल्या ज्यामध्ये नर्डी मॅच (मिक्स मॅच कोड), विबग्योर (रांगोळी), इम्प्रेशन(पोस्टर प्रेझेंनटेशन), वार ऑफ वर्डस (डिबेट), लैन गेमिंग, रिफ्लेक्शन (सेल्फी एडिटिंग) या स्पर्धांचा समावेश होता. अमरावती विद्यापीठा अंर्तगत येणाऱ्या विविध महाविद्यालयांनी या स्पर्धांना उस्फुर्त प्रतिसाद दिला ज्यामध्ये अमरावती व्यतिरिक्त अकोला,वरुड,जरुड,धामणगाव रेल्वे,यवतमाळ या ठिकाणांहूनही विद्यार्थी समाविष्ट होते.यावेळी रांगोळी स्पर्धेकरिता अँड्रोइड वर्जन/लिनक्स फ्लेवर, डिबेटकरिता सोशल मीडिया शाप की वरदान, पोस्टर प्रेझेंनटेशन करिता इ वेस्ट मेनेजमेंट/गो ग्रीन, अशा संकल्पना देण्यात आल्या होत्या .विद्यार्थ्यांनी उत्तमरित्या त्यांच्या कल्पना मांडल्या. स्पर्धानंतर लगेच बक्षीस समारंभाचा कार्यक्रम घेण्यात आला.समारोपीय कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॅा. ए. पी. बोडखे व प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एस. पी. कुळकणी (विभाग प्रमुख फर्स्ट इअर इंजिनीरिंग) विशेष अतिथी म्हणून डॉ. एच. एम. देशमुख (डीन,अकॅ डेमीक्स) व इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रोनिक्स अंड टेलीकम्युनिकेशन इंजिनिअर्सचे कोषाध्यक्ष डॉ. निक्कू खालसा हे उपस्थित होते. एम. सी. ए. विभागप्रमुख प्रा.रुपाली शेरेकर




यांनी कार्यक्रमाची संकल्पना सांगितली. विजेत्यांना बक्षीस व प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.रांगोळी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु.राधिका कुंतले व कु.रागिणी राउत(धामणगाव) द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक कु.पूजा काळे(धामणगाव) तर तृतीय क्रमांक कु.मनिषा कटकदेवरे(अमरावती),प्राजक्ता ठाकरे व पल्लवी महल्ले(धामणगाव) यांनी पटकविले.पोस्टर प्रेझेंनटेशन स्पर्धेमध्ये अकोला येथील कु. ऐश्वर्या कावळे, दक्शिता चौबे व मुनाझा फातमी यांनी प्रथम, कु. अश्विनी एओकर, कीर्ती छांगानी,साक्षी तन्ना(अमरावती) यांनी द्वितीय पारितोषिक तर काशिफ खान,कर्तव्या नाथिले(वरुड) यांनी तृतीय पारितोषिक मिळविले. लैन गेमिंग या स्पर्धेत प्रथम निशांत खुताफले,द्वितीय राघव मुंधडा तर तृतीय क्रमांक जगदीश मांडेकर (अमरावती) यांनी पटकविले. नर्डी मॅच स्पर्धेमध्ये अनास शेख(अकोला) प्रथम,शंतनू वोरा द्वितीय तर तृतीय मिलिंद सेवक(अमरावती) ठरले.डिबेट स्पर्धेत अमरावती येथील अजिंक्य मेटकर प्रथम, कु.सायली चोरे द्वितीय तर संकेत राजे हा तृतीय बक्षिसाचा मानकरी ठरला.सेल्फी एडिटिंग स्पर्धेत अमरावती येथील सुरज वाडेकर,अमोल बोधे व वैभव सोनोने क्रमशः प्रथम,द्वितीय व तृतीय ठरले.

कार्यक्रमादरम्यान डॉ. एच. एम. देशमुख यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले व विद्यार्थ्यांनी स्वतःवर प्रेम करून जगासाठीही उपयोगी पडावे असा संदेश दिला. डॉ.निक्कू खालसा यांनी विद्यार्थ्यांना खएढए बद्दल माहिती देऊन खएढए सदस्य होणे किती फायदेशीर आहे हे सांगितले. समारोपीय भाषणात प्राचार्य डॉ. ए. पी.बोडखे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.महाविद्यालयात होणाऱ्या विविध स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे सांगून त्यांना प्रेरणादायी मार्गदर्शनही केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्नेहलता उल्हे यांनी केले. प्रा.प्रीती देशमुख यांनी आभार व्यक्त केले. ऑक्युलस-२०१८ सुरळीत पार पाडण्यात एमसीए विभागातील विद्यार्थ्यांचा विशेष सहभाग होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा. ए. पी. किन्हीकर , प्रा. डी. आर. बांड्बुचे, प्रा. ए. जे. पिंप्रीकर, प्रा. डी. एस . देशमुख, प्रा. एन. डी. बोबडे, प्रा. व्ही. ए. सिन्हा, प्रा. पी. पी. देशमुख, प्रा. एस. डी. उल्हे, प्रा. एस. ए. घोगरे व श्री. आमझरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, कोषाध्यक्ष पंकज देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कार्यकारी सदस्य, उदय देशमुख, नितीन हिवसे, प्रा. गजानन काळे, प्रा.रागिणीताई देशमुख ह्यांचे मार्गदर्शन लाभले.